आदरणीय मंच, उपस्थित सर्व सहकारी आणि समोर बसलेल्या माझ्या सर्व भावांनो आणि बहिणींनो,

छत्रपती शिवाजी महाराजांना 396 व्या जयंतीनिमित्त मी त्रिवार मुजरा करून आजच्या व्याख्यानाला सुरुवात करतो.

शिवजयंतीची सुरुवात केली ती महात्मा ज्योतिराव फुले यांनी. 1869 साली महात्मा फुले यांनी झाडाझुडपात, पालापाचोळ्यात हरवलेली छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी मोठ्या कष्टाने शोधून काढली. त्यांनी समाधीची स्वच्छता केली त्यावर फुले वाहिली आणि त्याच ठिकाणी शिवजयंती उत्सव सुरू केला.
महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिवरायांच्या कार्यावर 908 ओळींचा पोवाडा देखील लिहिला.

जगाच्या पाठीवर आजवर शेकडो-हजारो राजे होऊन गेले. या सर्व राज्यांमध्ये फक्त भारतातीलच नाही तर साऱ्या जगातल्या या सर्व राजांमध्ये सर्वात मानाने आजही कुणाचं नाव घेतलं जात असेल, ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज.

असं काय वेगळेपण आहे छत्रपती शिवाजी महाराजांचे?
हे ज्याला समजेल त्याला खरं शिवचरित्र समजेल.

जगाच्या पाठीवर जितकेही राजे झाले त्यांपैकी कुणासाठीही लोकांनी स्वतःहून जीव दिला नाही.
मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी स्वतःहून जीव देणाऱ्या लोकांची यादी बनवली तर पुस्तकही कमी पडतील.
लोक शिवरायांसाठी स्वतःहून जीव द्यायला का तयार झाली, या प्रश्नाचे उत्तर ज्याला समजेल त्याला खरे छत्रपती शिवाजी महाराज कळतील.

शिवकार्य म्हटलं की आपल्याला आठवतात ते अनेक रोमांचक प्रसंग, महाराजांच्या लढाया, त्यात स्वतःच्या जीवाचं बलिदान दिलेले असंख्य मावळे!

**कहाणी पन्हाळगडाचा वेढ्याची –**
आदिलशाहीचा सरदार सिद्दी जोहरने पन्हाळगडाला वेढा दिला. या वेढ्यातून महाराजांची सूटका करण्यासाठी नेताजी पालकर, सिद्दी हिलाल आणि त्याचा मुलगा सिद्दी वाहवाह यांनी प्रयत्न केले, परंतू ते यशस्वी होऊ शकले नाहीत. वेढ्यामध्ये सुमारे ४ महिने गेले. गडावरील दाणा-वैरण संपत आले होते. आता पावसाळाही सुरू झाला होता. त्यामुळे महाराजांनी गडावरून निसटण्याची योजना आखली. पण हे इतके सोपे नव्हते. जर सिद्दी जौहरला समजले असते तर त्याने महाराजांचा पाठलाग करून त्यांना पकडले असते. त्यामुळे महाराज पकडले जाऊ नयेत म्हणून काहीतरी युक्ती करणे गरजेचे होते. त्यासाठी पुढे आले शिवा काशीद! शिवा काशीद महाराजांसारखे दिसायचे. त्यांनी महाराजांसारखे वेशांतर केले आणि ते गडावरच थांबले. शिवा काशीद गडावर थांबल्यामुळे महाराज विशाळगडाकडे निघू शकले. महाराज विशाळगडावर पोहोचेपर्यंत पावनखिंडीत सिद्दी जौहरच्या सैन्याला रोखून धरले ते बाजीप्रभू देशपांडे आणि त्यांच्यासोबतच्या शेकडो बांदल मावळ्यांनी!

शिवा काशीद यांना माहित होते की आपण पकडले जाणार, आणि त्यानंतर त्यांचा काही सत्कार होणार नव्हता तर, कठोर शिक्षा आपल्याला होणार. तरी ते थांबले. का?
तसेच बाजीप्रभू आणि त्यांच्यासोबतच्या मावळ्यांना कल्पना होती की आपला निभाव लागणार नाही, तरी त्या शूरांनी आपल्या प्राणाची बाजी लावली. का?
असे कितीतरी प्रसंग आहेत. सिंहगडची लढाई त्यात तानाजी मालूसरे यांना वीरमरण झाले.

आग्र्याहून सूटकेची रोमांचक कथा तर आपल्याला माहिती असेलच. त्यातदेखील हिरोजी फर्जंद महाराजांसारखे वेशांतर करून, आजारपणाचे सोंग घेऊन झोपून राहिले आणि महाराज पिटाऱ्यातून फरार झाले. स्वतःच्या जीवावर खेळून हिरोजी फर्जंदने असे केले. का?
आजच्या काळात कोणी कार्यकर्ता आपल्या नेत्यासाठी असा तयार होईल का?

लाख मेले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा जगलाच पाहिजे. असे मावळे म्हणत होते.
फक्त मावळेच नाही तर महाराजांची रयतदेखील शिवकार्यात सर्वस्वाचा त्याग करीत सहभागी होती.
रयतेला महाराजांचे कार्य व राज्य हे आपले राज्य आहे असे वाटत होते.
पण असं का होतं? महाराजांनी असं काय केलं होतं की, रयतेला त्यांचं आरंभलेलं कार्य आपलं वाटावं?
इतर राजांना जी रयतेची निष्ठा मिळाली नव्हती, ती महाराजांना का मिळाली? असा खरा प्रश्न आहे.
या प्रश्नाचं उत्तर ज्याला समजलं त्याला शिवकार्याचे मर्म समजेल.
त्यासाठी आपल्याला शिवपूर्व काळात काय परिस्थिती होती हे समजून घ्यावे लागेल.

त्या काळी सर्वसामान्य जनतेसाठी राजा कोण आहे, कोण आला, कोण गेला, याच्याशी काहीही संबंध नसे. कुणीही राजा आला किंवा गेला, कुणाचेही राज्य आले तरी सामान्य रयतेच्या जीवनात फरक पडत नसे. राजा असायचा आणि त्याच्याखाली वतनदार असायचे ते भरमसाठ वसुली करीत होते, रयतेवर अन्याय करीत होते, त्यांच्याविरुद्ध दाद मिळत नव्हती. राजे बदलले तरी कुलकर्णी, पाटील, वतनदार, देशमुख, जहागीरदार तेच असत. हे सर्वजण पटापट निष्ठा बदलत. जो जिंकला किंवा ज्यांचे राज्य असेल त्याला निष्ठा अर्पण करीत. स्वत:ची वतने शाबूत राखती, रयतेला छळीत, वसुली करीत, अन् राजाला हिस्सा देऊन देत. राजाला आपल्या हिस्स्याशी घेणेदेणे होते. त्याच्या खालील वतनदार शेतकऱ्यांवरती किती जुलूम करतात, याच्याशी त्याला काही घेणंदेणं नसे.

राज्य बदलले तरी जुनीच राज्ययंत्रणा ते राज्य राबवत होती व प्रजेला नागवत होती. वतनदार रयतेला छळत होते, लुटत होते, नागवत होते, पोरी-बाळींची अब्रु लुटली जात होती तरी राजाला पर्वा नव्हती. जोवर त्याचा वसूल वतनदार आणून देत होते, ते रयतेशी कसा व्यवहार करतात याच्याशी राजाला काही घेणंदेणं नव्हतं.

या परिस्थितीत छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे कार्य चालू केले:
सर्वप्रथम महाराजांनी जुलूमी वतनदारांना वेसन घातली. वतनदार हे मालक नाहीत तर राज्याचे नोकर आहेत अशी व्यवस्था त्यांनी निर्माण केली. वतनदारी नष्ट करून मुलखी-लष्करी सैनिक व अधिकाऱ्यांना वेतन सुरू करणारे ते पहिले राजे!
शिवरायांनी करपद्धतीत बदल केला. तुम्ही म्हणाल हा काय इतिहास आहे? यात काय लढाई नाही, तलवार नाही, वाघनखं नाही... काही रक्त सळसळंत नाही...

कारण आपल्याला असा इतिहास कधी सांगितलाच जात नाही. याचे देखावे बनत नाहीत. असा इतिहास सांगितला गेला तर मग आज जे काही चाललंय त्यावर तुम्ही विचारायला लागाल?

**छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतकऱ्यांविषयी धोरण:**

छत्रपती शिवाजी महाराजांचा कार्यकाळ सुरू झाल्याबरोबर त्यांनी सर्वात पहिले या जुलमी वतनदार-जहांगीरदारांवर चाप बसवला.

कोणत्या शेतकऱ्याच्या जमिनीतून किती उत्पादन निघेल याच्या अंदाजानुसार त्या शेतकऱ्याकडून किती शेतसारा वसूल करायचा हे ठरवून दिले.
ठरवून दिलेल्या शेतसाऱ्यापेक्षा एक दाणाही जास्त वसूल करायचा नाही, अशी सक्त ताकीद दिली.

वतनदारांनी शेतसारा वसूल केला तरी त्यांना पगार मिळेल आणि नाही केला तरी त्यांना पगार मिळेल, अशी सोय छत्रपती शिवाजी महाराजांनी लावून दिली.
त्यामुळे रयतेला लुटण्याचे काही कारणच वतनदारांकडे उरले नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी दुष्काळात शेतकऱ्यांना शेतसारा माफी केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळामध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळवण्यासाठी मोर्चे, आंदोलने, उपोषणे, रस्ता रोको करावे लागले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांना शेतकऱ्यांच्या दुखाची जाण होती. म्हणूनच त्यांना जाणता राजा म्हटले जाते.

शेतकऱ्यांना शेतीसाठी मदत म्हणून बी-बियाणे, नांगर, जमीन इतकेच नाही तर बैलही दिले. लांडगे, कोल्हे आणि रानडुकरांपासून शेतीला संरक्षण हे दिले.

पूर्वीचे राजे आणि वतनदारांच्या प्रचंड जुलुमाखाली चिरडल्या गेलेल्या रयतेने हे पाहिले आणि त्यांना असे वाटले, की हे नवीन राजे आपली काळजी करणारे आहेत. त्यांना पहिल्यांदाच त्यांच्यासाठी कुणीतरी राज्य घडवत आहे, असे वाटले. म्हणून ही रयत शिवकार्यात सहभागी झाली.

त्यांनी सैनिकांना म्हटले आहे की रात्री झोपताना दिव्याची वात पूर्ण विझवून झोपा, नाही तर एखादा उंदिर येईल, ती वात वाळलेल्या पिकामध्ये घेऊन जाईल आणि एवढं मेहनतीनं पिकवलेलं सगळं खाक होऊन जाईल.
कोणी राजा इतका संवेदनशील कसा काय असू शकतो? आता तुम्हाला हळूहळू आपल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मिळायला सुरूवात झाली असेल.

पूर्वीच्या वतनदारांचे सैन्य शेतकऱ्यांच्या उभ्या पिकातून जायचे. छाती एवढं वाढलेलं पीक शेतकरी आपल्या डोळ्यापुढे मातीमोल होताना पाहत होता. मात्र त्यावर दाद मागू शकत नव्हता. कारण ज्याकडे दाद मागायची त्याच्यात सैन्यानं पिकाची धुळधन केलेली असायची.

छत्रपती शिवाजी महाराजांनी ही पद्धत बदलली. त्यांनी सैन्याला सक्त ताकीद दिली, की स्वराज्याचा सैन्य हे शेताच्या बांधाबांधानच गेलं पाहिजे. नाहीतर लोकांना वाटेल आपल्यापेक्षा मोगल बरे.

विचार करा त्या शेतकऱ्याला वाटलं असेल की नाही, अरे मी मेलो तरी चालेल पण माझ्या या पिकांची आणि शेतीची काळजी करणार हा राजा जगला पाहिजे.
म्हणून लोक स्वराज्यासाठी स्वत:हून जीव द्यायला तयार झाली.

म्हणूनच शिवा काशीद, तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे यांसोबत असंख्य मावळ्यांनी बलिदान दिले, कारण - त्यांना माहित होते की त्यांच्या मागे स्वराज्य आहे, ते त्यांच्या घरच्यांची आणि रयतेची काळजी करेल.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्वसमावेशक धोरण:**

रयतेला स्वराज्य आपल्या वाटण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी उपेक्षित समजल्या गेलेल्या लोकांना स्वराज्याच्या कार्यात सहभागी करून घेतले.
शिलेदार बनवताना जातीचा नाही तर त्यांच्या अंगी असलेल्या गुणांचा विचार केला.
तुकाराम महाराज म्हणतात,
***याती कुळ येथे असे अप्रमान, गुणाचे कारण असे अंगी***

छत्रपती शिवाजी महाराजांनी नेहमी मावळ्यांच्या गुणांना महत्त्व दिले.
आजही ज्यांना उपेक्षित समजले जाते अशा समाजाच्या लोकांना छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याकाळी महत्त्वाचे खाते दिले.
हेरगिरी खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक हे रामोशी समाजाचे होते.
शिवा न्हावी हा मावळा न्हावी समाजाचा होता.
मदारी मेहतर हा शिवरायांच्या गादीचा सेवक होता.

शिवाजी महाराजांनी सामान्यांना मोठे केले. मग सामान्यांनी शिवाजी महाराजांना मोठे केले. आणि मग सर्वांनी मिळून मोठे कार्य केले.

खरंतर क्षमता प्रत्येकामध्येच असतात. मात्र त्यांना संधी मिळण्याची गरज असते.
ज्यांना उभ्या आयुष्यात कधीही संधी मिळाली नाही अशा लोकांना छत्रपती शिवाजी महाराजांनी संधी दिली, आणि त्या लोकांनी त्या संधीचे सोने केले.
छत्रपती शिवाजी महाराजांनी तळागाळातल्या लोकांचा आत्मसन्मान जागा केला आणि त्यांना आत्मविश्वास दिला. यामुळे सर्वजण स्वराज्यासाठी लढायला आणि प्रसंगी मरायला तयार झाली.

**छत्रपती शिवाजी महाराजांचा महिला विषयक दृष्टिकोन:**
शिवरायांनी जशी शेतकऱ्यांची आणि उपेक्षितांची काळजी घेतली तशाच पद्धतीने हजारो वर्षांपासून उपेक्षित असलेल्या महिलांची आणि त्यांच्या अब्रूचीही काळजी घेतली.

रांझाच्या पाटलाची कथा:
राझा गावच्या वतनदार पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या पोरीला दिवसाढवळ्या सर्वांच्या देखत उचलून नेली आणि तिच्यावर बलात्कार केला. माती झालेल्या जिण्यापेक्षा मरण बरं, म्हणून त्या पोरीने जीव दिला. सारा गाव हळहळला, पण कुणीच काही बोललं नाही.
शिवाजी महाराजांच्या कानी ही गोष्ट आली. पाटलाच्या मुसक्या बांधून त्याला दरबारात आणण्याचा आदेश महाराजांनी दिला. त्यानंतर त्याला हातपाय तोडायची शिक्षा केली. ही शिक्षा आमलात आणली गेली तेव्हा साऱ्या मावळ खोऱ्यात आश्चर्य पसरलं. गरीब रयतेच्या पोरीवर अन्याय झाला म्हणून वतनदार पाटलाला जबर शिक्षा झाल्याचे पाहून रयत शिवाजी महाराजांवर फिदा झाली. ज्यांच्या पाठबळावर राज्य करायचे, अशा वतनदारांची सुद्धा गय शिवाजी महाराजांनी केली नाही.

कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची कथा:
लुटीत आलेल्या कल्याणच्या मुसलमान सुभेदाराच्या सुनेला शिवाजी महाराजांच्या समोर हजर केले गेले. त्या तरुण, सुंदर, मुस्लिम स्त्रीकडे पाहून तिच्यासंबंधी काही गैरउद्गार न काढता आणि गैरव्यवहार न करता, शिवाजी महाराजांनी साडी-चोळी देऊन तिची पाठवणी केली.
लढाईत किंवा लूट करताना मुस्लिम किंवा हिंदू कोणत्याही धर्माच्या स्त्रिया हाती आल्या तर "त्यांना तोशीस लागता कामा नये व त्रास होता कामा नये", अशा सक्त आज्ञा शिवाजी महाराजांनी दिल्या होत्या व त्या आमलात आणल्या होत्या.

सावित्रीबाई देसाईची कथा:
1678 मध्ये सकूजी गायकवाड नावाच्या सेनापतीने बेळवाडीच्या किल्ल्याला वेढा दिला. या किल्ल्याची किल्लेदार एक स्त्री होती. तिचे नाव सावित्रीबाई देसाई. या बहादूर स्त्रीने 27 दिवस किल्ला लढवला. पण सकूजीने शेवटी किल्ला जिंकला. विजयाच्या उन्मादात सूड भावनेने त्याने सावित्रीबाई देसाईवर बलात्कार केला. ही बातमी ऐकून शिवाजी महाराज संतापले. त्यांनी सकूजी गायकवाडचे डोळे काढून त्याला जन्मभर तुरुंगात डांबले. आपल्या विजयी सेनापतीने शत्रू स्त्रीवर बलात्कार केला म्हणून त्याची गय केली नाही. कारण शिवाजी महाराजांची भूमिका होती - "स्त्रियांची इज्जत कायम राहिली पाहिजे, मग ती कुणीही असो!"

न्याय फक्त देऊन चालत नाही तर न्याय दिसला देखील पाहिजे. त्या बदल्यात सामान्य माणसे महाराजांची फक्त समर्थक नाही तर स्वराज्य उभारणीच्या कार्यात सक्रिय सभासद बनले.

**छत्रपती शिवाजी महाराजांचा धर्मविषयक दृष्टीकोण:**
छत्रपती शिवाजी महाराज हिंदू धर्माला मानत होते. मात्र ते दुसऱ्या कोणत्याही धर्माचा द्वेष करत नव्हते. ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी कसलाही जातीभेद केला नाही त्याच पद्धतीने त्यांनी धर्मभेदही केला नाही.
उदाहरणे:
- स्वराज्याच्या सैन्यामध्ये 700 पठाणांची एक तुकडी होती
- छत्रपती शिवरायांनी स्वराज्याची काही महत्त्वाची खाती मुस्लिम सरदारांना दिली
- स्वराज्याच्या तोफखान्याचा प्रमुख इब्राहिम खान होता
- छ. शिवाजी महाराजांच्या वकिलाचे नाव काझी हैदर
- आरमार प्रमुख दर्यासारंग दौलत खान

अफजलखानाला मारल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याची कबर बांधली आणि त्यानंतर त्या कबरीच्या दिवाबत्तीची सोय व्हावी अशी आज्ञाही दिली.

ज्या वेळेस औरंगजेबाने जिजीया कर लावला त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबाला पत्र लिहिले. त्या पत्रात ते म्हणतात,
"कुराण ही ईश्वराची वाणी आहे. मुसलमान बांग देतात आणि हिंदू देवळात घंटा वाजवतात. हे सर्व लोक ईश्वरापाशी एक रंग आहेत."
ही खरंतर संतांची भाषा आहे.

शिवाजी महाराजांची आज्ञा होती की "ज्याच्या जो धर्म आहे त्याने तो करावा म्हणजे कोणीही त्यात बखेडा करू नये.”

या गोष्टी आपल्याला सांगतात की छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात कसलाही धार्मिक द्वेष नव्हता.
ते मनाने प्रचंड उदार राजे होते.
आणि म्हणूनच सर्व जाती-धर्माचे मावळे स्वराज्याच्या कार्यात सहभागी झाले.

- शिवरायांबद्दल टोकाचे नकारात्मक लेखन करणारे इतिहासकार खाफीखान म्हणतात, शिवाजी महाराजांना पवित्र कुराणची प्रत मिळाल्यास ते मुस्लिम सेवकाकडे आदराने सुपूर्द करत. शिवाजी महाराज वैयक्तिक आयुष्यात हिंदू असले तरी त्यांनी त्यांचा धर्म त्यांच्या राजकारणापासून आणि सामाजिक जीवनापासून दूरच ठेवला.

**त्याकाळच्या लढाया: सत्तेसाठी होत्या धर्मासाठी नाही**
उदाहरण:
अफजलखानाच्या वकिलाचे नाव कृष्णाची भास्कर कुलकर्णी.

शिवाजी महाराजांच्या वकिलाचे नाव काजी हैदर, तोफखाना प्रमुखाचे नाव इब्राहिम खान, त्यांचे अनेक अंगरक्षक मुस्लिम.

औरंगजेबाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांवर चाल करून येण्यासाठी मिर्झाराचे जयसिंग आला. जयसिंगाच्या सैन्यात अनेक हिंदू राजपूत, जाट सरदार होते.

जावळीचे चंद्रराव मोरे, फलटणचे निंबाळकर, सावंतवाडीचे खेम सावंत, मुधोळचे बाजी घोरपडे हे सर्व छत्रपती शिवाजी महाराजांना शत्रू मानत होते.

त्याकाळी राजा हिंदू असो वा मुस्लिम, त्यांच्या पदरी दोन्ही धर्माचे सैनिक आणि सरदार असायचे.

तानाजी मालुसरेंसोबत लढाई करणारा कोंढाण्याचा किल्लेदार उदनभानसिंग हा राजपूत सरदार होता.

आज, इतिहासाची मोडतोड करून भांडण लावली जात आहेत त्यामुळे लोकांची मने जोडण्यासाठी खरा इतिहास जाणणे खूप गरजेचे आहे.

**शिवरायांचे विचार आणि भारतीय संविधान**
शिवरायांच्या विचारांना कायद्याचे स्वरूप कोणी दिले असेल ते म्हणजे भारतीय संविधानाने.
सर्वधर्मसमभाव, श्रीमंत-गरीब दरी कमी करणे, गुलामांचा व्यापार बंदी, महिलांचा आदर
शेतकऱ्यांची काळजी -> ही सर्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या कल्याणकारी स्वराज्याची लक्षणं आहेत.
अशाच देशाची कल्पना संविधान म्हणते.
शिवरायांना अभिवादन म्हणजे संविधानाचा मान राखणे.
अन्यायाच्या विरोधात लढणारा खरा मावळा असतो चला शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालू या आणि खरा मावळा बनवूया. शेवटी शिवशपथ घेणे.

**जय जिजाऊ! जय शिवराय!**